मागणी क्र.डब्ल्यू-३, मुख्य लेखाशिर्ष-२२०३, तंत्रशिक्षण या लेखाशिर्षाखालील ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर) वितरीत करणेस मंजूरी देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन ज्ञापन क्रमांक: तंबांनि-१२१९/(प्र.क्र.१२७/१९)/तांशि-३,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक:- १८ सप्टेंबर, २०१९.

संदर्भ: -
१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०१ एप्रिल, २०१९.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८ जुलै, २०१९.
३) संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.७/अर्थसं/ख.प्र.मान्यता/२०१९/८५, दि.९ ऑगस्ट, २०१९.

शासन ज्ञापन:- संदर्भाधीन शासन परिपत्रक, वित्त विभाग, दि.८ जुलै, २०१९ सोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक-९ नुसार अटी व शर्तीची पूर्तता होत असल्याने सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मागणी क्र.डब्ल्यू-३, २२०३, तंत्रशिक्षण या मुख्य लेखाशिर्षांतर्गत खालीलप्रमाणे रु.१,७६,४५,०००/- च्या ६० टक्के प्रमाणे रु.१,०५,८७,०००/- (रुपये एक कोटी पाच लाख सत्त्याऐंशी हजार फक्त) इतका निधी कोषागारातून आंहरित व वितरीत करण्यास याव्दारे मंजूरी देण्यात येत आहे.

अ. क्र.	मुख्य लेखाशिर्ष २२०३-तंत्रशिक्षण मागणी क्र.डब्ल्यू-३	सन २०१९-२० मध्ये अर्थसंकल्पित तरतूद	वितरीत करावयाची तरतूद
१	१०४ अशासकीय तंत्रमहाविद्यालये व संस्थांना सहाय्य (०१)(०२) तंत्रनिकेतने (अनिवार्य) २२०३ ०१५८, ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	१,०७,००,०००/-	६४,२०,०००/-
२	१०४ अशासकीय तंत्रमहाविद्यालये व संस्थांना सहाय्य (०१)(०३) अभियांत्रिकी महाविद्यालये (अनिवार्य) २२०३ ०१६७, ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	६९,४५,०००/-	४१,६७,०००/-
	एकुण	**१,७६,४५,०००/-**	**१,०५,८७,०००/-**

२. वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.८ जुलै, २०१९ च्या परिपत्रकानुसार आवश्यक असलेल्या बाबींचा तपशील पुढीलप्रमाणे:-

अक्र.	तपासणी बाबतचा तपशील	अभिप्राय
१	विभागास प्रदान वित्तीय अधिकार	शासन परिपत्रक, वित्त विभाग दि.८ जुलै, २०१९ अन्वये प्रशासकीय विभागास पूर्ण अधिकार.

२	मंजूर निधी	सन २०१९-२० मध्ये १)१०४ अशासकीय तंत्र महाविद्यालये व संस्थांना सहाय्य (०१)(०२) तंत्रनिकेतने २२०३ ०१५८ अंतर्गत रु.१,०७,००,०००/- २) १०४ अशासकीय तंत्रमहाविद्यालये व संस्थांना सहाय्य (०१)(०३) अभियांत्रिकी महाविद्यालये, २२०३ ०१६७ अंतर्गत रु.६९,४५,०००/- असा एकूण रु.१,७६,४५,०००/- इतका निधी मंजूर आहे.
३	मागील ३ महिन्यापूर्वी दिलेल्या अनुदानापैकी ७५% किंवा अधिक निधी खर्च झाला आहे.	सन २०१९-२० मध्ये अद्याप निधी वितरीत केलेला नाही.
४	ज्या लेखाशिर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे त्या लेखाशिर्षांतर्गत १ वर्षापूर्वीचे संक्षित देयक प्रलंबित आहे.	या लेखाशिर्षाअंतर्गत १ वर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.
५	स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देताना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यात आली आहे.	संबंधित नाही.
६	वैयक्तिक लाभार्थींचे देयक सादर करताना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे.	संबंधित नाही.
७	बांधकाम विषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देताना सक्षम अधिका-यांची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात असावा.	सदर प्रकरणी बांधकामास प्रशासकीय मान्यता या आगोदरच देण्यात आली आहे.
८	अधिनस्त कार्यालयांना खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा शासन निर्णय निर्गमीत करण्यापूर्वी अशा खरेदीसाठी रितसर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढावेत.	संबंधित नाही.
९	खरेदी विषयक प्रक्रिया अद्यावत उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४, दि.१ डिसेंबर, २०१६ च्या शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा.	संबंधित नाही.
१०	साहित्य खरेदीची रक्कम पुरवठादारांच्या नांवे ECS व्दारे आहरित करावी.	संबंधित नाही.

३. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. डब्ल्यू-३, मुख्य लेखाशिर्ष २२०३, तंत्रशिक्षण या लेखाशिर्षाखालील उपरोक्त दोन उपलेखाशिर्षांतर्गत मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर निधी वितरीत करण्यासाठी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी व लेखा अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आंहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

५. संचालकांनी संबंधित संस्थांना या योजनेसाठी चालू वर्षी दिलेल्या व यापूर्वी दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

६. हे शासन ज्ञापन वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.८ जुलै, २०१९ च्या परिपत्रकातील परिच्छेद- २ मधील तरतूदीनुसार निधी आंहरित करण्याबाबत दिलेल्या अधिकारानुसार व या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.९ येथील अटी व शर्तींची पूर्तता झाल्याची खात्री करुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असुन त्याचा सांकेतांक २०१९०९१८१११६१८९९०८ असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANALI MILIND SAMANT

Digitally signed by MANALI MILIND SAMANT
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=a393e9553ec410a2133a89ca969ca76abd4ca892102ef711a7fff2d0c54599c7, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=c63b0a0419f0eb37099daca08e4cccce3bf49154bf43e8881e68ac2ca3a46392, ou=HIGHER AND TECH, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=MANALI MILIND SAMANT
Date: 2019.11.19 16:29:19 +05'30'

(मनाली सामंत)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
३. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. संबंधित संस्था (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
६. नियोजन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. कार्यासन साशि-१/तांशि-२, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती/तांशि-३.